## नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४०/२०१६

(इर्शाद अहमद मोहद्दीन शेख विरुध्द अहमद इब्राहीम खान)

## :– नि. २९ खालील आदेश –:

अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादी यांनी सदरचा अर्ज या दाव्यातील प्रतिवादी अहमद इब्राहीम खान हा दिनांक ०७/१२/२०२२ रोजी मयत झालेला आहे. सबब, वादीने प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांचे अर्जातील कथन की, प्रतिवादी यास १अ. सिराजबी अहमद खान, १ब. हसन अहमद खान, १क. अफताफ अहमद खान, १ड. मुनीरा अन्वर शेख, १इ. फिरोज अहमद खान, १फ. परवीन अहमद खान व १ज. रेश्मा अहमद खान हे वारस आहेत. या व्यतिरिक्त आणखी कोणीही वारस नाहीत. मध्यतरीच्या काळात वादी हे काविळीच्या आजाराने त्रस्त असल्याने त्यांना पुर्णपणे अशक्तपणा आलेला असल्याने त्यांना हिंडता फिरता येत नव्हते. त्यामुळे मयत प्रतिवादी यांचा मृत्यु दाखला व वारसांबाबतची तजविज वादी यांना मुदतीत म्हणजेच ९० दिवसांचे कालावधीत दाखल करणे शक्य झालेले नाही. त्यामुळे वारस दाखल करणेस १३ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदर विलंबामागे वादी यांचा कोणताही निष्काळजीपणा अगर हलगर्जीपणा नाही. सबब, प्रतिवादीचे वारस दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

०३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. तसेच अर्जात खाडाखोड केलेली असून त्या समोर अद्याक्षर केलेले नाही अशी हरकत घेतली आहे.

०४. मुदतीचा कायदा आर्टीकल १२० नुसार दाव्यातील एखादा पक्षकार

मयत झाल्यास मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत मयत पक्षकाराच्या कायदेशीर प्रतिनिधींना दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेणे आवश्यक असते. त्याचबरोबर अशा मयत पक्षकाराबाबत दावा उपशमित झाल्यास आर्टीकल १२१ नुसार ६० दिवसांच्या आत तो आदेश रद्द करुन घेणे आवश्यक आहे.

**०५.** प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी अहमद इब्राहीम खान हा दिनांक ०७/१२/२०२२ रोजी गाव मौजे कुडाळ येथे मयत झाला आहे. त्यामुळे मृत्यू तारखेपासून पुढे ९० दिवसांचे आत त्यांचे कायदेशीर प्रतिनिधीबाबत दाव्यामध्ये तजवीज करणे आवश्यक होते. परंतु वारस दाखल करण्यास त्यांना विलंब झालेला आहे. प्रस्तुतचा दावा, दावा मिळकतीचा बळकावलेला कब्जा परत मिळणेसाठी, कायमची व अज्ञार्थी ताकिद होणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादीचे वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. सबब सदरचा विलंब माफ करणेकरीता सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. परंतु वादी यांनी सदरचा अर्ज विलंबाने दिलेला असल्यामुळे त्याच्यावर योग्य तो खर्च लावणे आवश्यक आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–: <u>आदेश</u> :–**

१. नि. २९ कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी प्रतिवादी यांना रक्कम रुपये २००/– (रुपये दोनशे मात्र ) इतका खर्च देण्याच्या अटीवर मयत प्रतिवादी यांचे कायदेशीर प्रतिनिधी दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

सही/–

दिनांक– १२/०३/२०२४ (प.रा.ढोरे )

सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कुडाळ.